


संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने    कार्यकारी संपादक : श्याम तिवारी




Sangamner ▪ MAHMAR/2018/75654 ▪ वर्ष ८ ▪ अंक ८० ▪ ३१/७/२०२५ (दैनिक) ▪ किंमत रु.२/- ▪ पाने ४







# संगमनेर शहर पोलिसांकडूनच सिग्नल व्यवस्थेचा 'खेळ'!



## पूर्तता होवूनही कर्मचारी 'गायब'

## पोलीस अधिक्षकांचा आदेशही टोपलीतच

▪ तब्बल पाच वर्षानंतर सुरु झालेल्या संगमनेरच्या सिग्नल व्यवस्थेवरुन वाहतुकीचे नियमन व्हावे व वैभवशाली शहराचे बिरुद मिरवणाऱ्या संगमनेर शहराच्या गचाळ वाहतूक व्यवस्थेला शिस्त लागावी अशी सर्वसामान्य संगमनेरकराला अपेक्षा आहे. त्यामुळे पोलीस अधिक्षकांच्या आदेशाचे शहरात उत्स्फूर्त स्वागत होण्यासह कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्याच्या उपस्थितीशिवायही सुरु करण्यात आलेल्या हॉटेल काश्मिरसमोरील सिग्नलचे बहुतेक वाहनचालक पालन करताना दिसत आहेत. मात्र त्याचवेळी तीनबत्ती चौक आणि अकोले नाका येथील वाहतुकीच्या गचाळपणात मात्र कोणताही बदल नसून कार्यान्वीत असूनही सिग्नलचे नियमन होत नसल्याने लाखों रुपये खर्च करुन उभारलेल्या या यंत्रणेचा पोलिसांकडूनच खेळ सुरु असल्याचे दुर्दैवी चित्र सध्या संगमनेरात दिसत आहे.

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

संगमनेरच्या गचाळ वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानंतर बंद असलेली सिग्नल व्यवस्था पुन्हा सुरु करण्यात आली. अधिक्षकांच्या आदेशाचा सन्मान करताना पालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या दोघांनीही आपापल्या जबाबदाऱ्या पूर्ण करीत नादुरुस्त दिवे सुरु करण्यासह वाहनांसाठी थांबारेषाही आखून दिली. मात्र प्रत्यक्षात त्यावरुन वाहतुकीचे नियमन करण्याची जबाबदारी असलेले पोलीस अद्यापही सिग्नलवरुन गायबच आहेत. वास्तविक पोलीस अधिक्षकांनी १५ जूनपासूनच सिग्नलद्वारा वाहतूक नियमनाचे आदेशाचे दिले होते. मात्र त्यालाही आता दीड महिन्याचा काळ लोटल्याने शहर पोलिसांच्या निष्क्रिय मानसिकतेचे दर्शन घडू लागले असून त्यांच्याकडूनच सिग्नल व्यवस्थेचा खेळ सुरु असल्याचे दुर्दैवी चित्र सध्या संगमनेरात दिसत आहे.

पाच वर्षांपूर्वी पालिकेने परस्पर खरेदी करुन पाच **(पान ३ वर)**

# निमोण व कोंची परिसरात चोऱ्यांचे सत्र!

## पहाटे घरफोडीच्या घटना; दागिन्यांसह रोकड लंपास

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

संगमनेर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दित चोऱ्यांचे सत्र सुरुच असून आज पहाटेच्या सुमारास निमोण आणि कोंची परिसरात दोन ठिकाणी चोरट्यांनी डाव साधल्याचे समोर आले आहे. या दोन्ही घटनांमध्ये चोरट्यांनी सोन्याच्या दागिन्यांसह रोकड लांबवल्याचीही प्राथमिक माहिती असून तालुका पोलिसांनी घटनास्थळी जावून पाहणीही केली आहे. चोरीच्या वाढत्या प्रकारांनी ग्रामीणभागात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी केवळ गुन्हे दाखल करण्याचे सोपस्कार टाळून त्यांचा तपास करण्याची मागणीही होत आहे. **(पान ३ वर)**

# भोजापुर पूरचारीचे पाणी शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी नियोजन करा : ना. विखे पाटील

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



भोजापूर धरण लाभक्षेत्रातील पुरचारीला सोडण्यात आलेले पाणी शेवटच्या गावाला व शेतकऱ्याला मिळेपर्यंत जलसंपदाच्या अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे नियोजन करावे असे निर्देश जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. वर्षानुवर्षे पाण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना महायुती सरकारमुळे न्याय देता आल्याचे समाधानही त्यांनी यावेळी **(पान ३ वर)**






















सुविचार : निघून गेलेला क्षण कधीच परत आणता येत नाही.

## सामरीक सज्जतेची नवी झलक

भारताने अलीकडेच तीन क्षेपणास्त्रांची चाचणी करून दक्षिण आशियामध्ये खळबळ उडवून दिली. यापैकी दोन क्षेपणास्त्रे अण्वस्त्र वाहून नेण्यास सक्षम आहेत, हे विशेष. क्षेपणास्त्र चाचणी करणे ही काही नवी गोष्ट नाही. ती एक नियमित प्रक्रिया असून ती नवीन क्षेपणास्त्रांसोबतच सेवेत असलेल्या क्षेपणास्त्रांची देखील केली जाते. मात्र, या तिन्ही चाचण्या अवघ्या २४ तासांच्या आत घेण्यात आल्या आहेत. ऑपरेशन सिंदूरनंतर भारत–पाकिस्तान संघर्ष आणि भारत–चीन संबंधांच्या पार्श्वभूमीवर या चाचण्या महत्त्वाच्या आहेत. त्याचबरोबर आपल्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील शेजारी सुरु असलेल्या भू–राजकीय परिस्थितीच्या दृष्टीनेही या चाचण्यांचे मोल अनन्यसाधारण आहे. या तिन्ही चाचण्या भारतीय सशस्त्र दलांच्या स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. चाचणी घेण्यात आलेल्या क्षेपणास्त्रांमध्ये अग्नी–१ आणि पृथ्वी–२ या शॉर्ट रेंज बॅलेस्टिक मिसाईलचा (एसआरबीएम) समावेश असून ही क्षेपणास्रे पारंपरिक तसेच अण्वस्त्र वाहून नेण्यास सक्षम आहेत. पृथ्वी–२ ची मारक क्षमता २५० ते ३५० किलोमीटर असून पेलोड क्षमता ५०० ते १००० किलोपर्यंत आहे. अग्नी–१ ची मारक क्षमता ७०० ते १२०० किलोमीटर असून १००० किलो पेलोड नेण्यास समर्थ आहे. जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या या दोन्ही क्षेपणास्त्रांचा वापर चीन व पाकिस्तान यांच्या महत्त्वाच्या आणि सामरिक उद्दिष्टांवर केला जाऊ शकतो. अग्नी–१ ची १२०० किलोमीटरची जाहीर केलेली क्षमता संपूर्ण पाकिस्तानला कव्हर करण्यास पुरेशी आहे. या दोन्ही क्षेपणास्त्रांना ट्रकवरून लाँच करता येत असल्यामुळे त्यांची तातडीने तैनाती करणे सोपे आहे. ही क्षेपणास्त्रे विविध ठिकाणांवरून डागता येतात. तिसरे क्षेपणास्त्र आकाश प्राईम हे आकाश–१ आणि १एस या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांचे सुधारित स्वरूप आहे. याचा वापर ऑपरेशन सिंदूरदरम्यान करण्यात आला होता. पाकिस्तानने पाठवलेले ड्रोन आणि क्षेपणास्त्रे याच क्षेपणास्त्रांच्या साहाय्याने अत्यंत प्रभावीपणे पाडण्यात आली होती. आकाश प्राइममध्ये हिमालयासारख्या अतिउंच ठिकाणी तैनातीसाठी आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. १५००० फूट उंचीवरील लडाखच्या थंड हवामानात आणि ऑक्सिजनची कमतरता असणाऱ्या भागात आकाश प्राईमने दोन वेगवान हवेत असलेल्या लक्ष्यांचा अचूक वेध घेतला. आकाश प्राईम हे भारताच्या स्वदेशी हवाई संरक्षण यंत्रणेचा भाग आहे. हे २० किलोमीटर अंतरावर ६० किलो पेलोड वाहू शकते. त्याची स्वयंचलित मार्गदर्शन पद्धत आणि आत्मसंकट मूल्यांकन क्षमता यामुळे हे क्षेपणास्त्र अत्युच्च उंचीवर क्षेपणास्त्रे, विमाने व ड्रोन यांच्याविरोधात अत्यंत प्रभावी आहे.

कार्यप्रदर्शनादरम्यानही हे क्षेपणास्त्र आवश्यकतेनुसार दिशा किंवा योजना बदलण्यास सक्षम आहे. हे एक घातक क्षेपणास्त्र असून ते एकदा डागल्यावर लक्ष्याचा अचूक विनाश करते. आकाश प्राईमचे लाँचर हलके असून एका जागेतून दुसऱ्या जागी सहज हलवता येतात व प्रत्येक लाँचर एकावेळी तीन क्षेपणास्त्रे डागू शकतो. भारतीय स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडनुसार, तीनही क्षेपणास्त्रांची – अग्नी–१, पृथ्वी–२ आणि आकाश प्राइम – तांत्रिक व परिचालन निकषांवर यशस्वी चाचणी झाली आहे. यामुळे गरज पडल्यास या क्षेपणास्त्रांची त्वरित तैनाती व वापर शक्य आहे. पृथ्वी आणि आकाश क्षेपणास्त्रे नवीन नाहीत. त्यांचा विकास अनेक वर्षांपासून सुरू आहे आणि ती आधीच सशस्त्र दलांत समाविष्ट आहेत. मात्र, या चाचण्यांमुळे या क्षेपणास्त्रांच्या नेव्हिगेशन, मार्गदर्शन व अन्य प्रणालींमध्ये कोणते बदल व सुधारणा झाल्या याचा आढावा घेतला गेला असणार आहे. ज्या अचूकतेने या चाचण्या पार पडल्या आहेत, त्याने निश्चितच रावळपिंडी आणि बीजिंगमध्ये बसलेल्या शक्तींना हादरवले असेल. जरी भारत–चीन दरम्यान अलीकडील चर्चेनंतर चीनकडून संबंध सामान्य स्थितीत आणण्याचे संकेत मिळत असले, तरी लडाख आणि अरुणाचलच्या सीमांवर घडलेल्या घटनांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. लडाखमधील गलवान खोरे, पँगाँग सरोवर आणि डेपसांग मैदान तसेच अरुणाचलमधील तवांग सेक्टरमधील घडामोडी विसरता येणार नाहीत.दुसरीकडे, पाकिस्तान ऑपरेशन सिंदूरमधील लाजिरवाण्या पराभवानंतर अपमानित आणि अस्वस्थ असेल आणि नक्कीच पुन्हा नव्या धाडसी कारवाईची तयारी करत असेल. भारताच्या या यशस्वी व तातडीच्या क्षेपणास्त्र चाचण्या अनेक प्रकारे आपल्या युद्धसज्जतेचा पुरावा देतात, मग तो आक्रमणासाठी असो वा संरक्षणासाठी. या चाचण्या आपल्या विरोधकांकडून होणाऱ्या कोणत्याही दुःसाहसाविरुद्ध आपल्या प्रादेशिक अखंडतेच्या रक्षणाच्या संकल्पनाही स्पष्ट करतात.या यशस्वी क्षेपणास्त्र चाचण्यांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे आपल्या संरक्षण उत्पादन क्षेत्रातील आत्मनिर्भरतेत मिळालेली प्रगती. हे 'विकसित भारत' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांचे सशक्त व गौरवास्पद प्रदर्शन आहे.

## कार्यालयीन विश्वातील 'कोल्ड प्ले'

कव्हर स्टोरी


**नोकरीच्या ठिकाणी जुळणारी मने ही नवीन गोष्ट नाही. परंतु, जेव्हा ही मने अधिकार, जबाबदारी आणि संस्थेच्या धोरणात्मक मर्यादा ओलांडतात तेव्हा प्रश्न केवळ वैयक्तिक आयुष्याचा राहत नाही, तर तो कंपनीच्या मूल्यप्रणालीपासून समाजातील नैतिकतेपर्यंत जातो. आजच्या ग्लोबल, डिजिटल आणि 'ओपन कल्चर'च्या काळात कार्यालयीन संबंध हे केवळ प्रेम किंवा आकर्षणापुरते मर्यादित राहत नाहीत, तर त्यांचा थेट परिणाम संस्थेच्या प्रतिष्ठेवर, कामकाजाच्या पारदर्शकतेवर आणि कायदेशीर बांधिलकीवर होतो. अलीकडेच अँडी बायरन या अमेरिकन कंपनीच्या सीईओच्या राजीनाम्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा 'वर्कप्लेस रोमान्स'चा विषय चर्चेत आला आहे. या नाजूक विषयाचे विविध पदर जाणून घेणे गरजेचे आहे.**

■ विनिता शाह

अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका व्हिडिओमुळे संपूर्ण कॉर्पोरेट जगतात खळबळ उडाली आहे. कोल्डप्ले या प्रसिद्ध म्युझिक बँडच्या लाईव्ह कॉन्सर्टमध्ये ॲस्ट्रोनॉमर या कंपनीचे माजी सीईओ अँडी बायरन आणि त्यांच्या मानव संसाधन विभागाच्या प्रमुख (एचआर हेड) यांच्यातील अतिजवळीक आणि खासगी क्षणाचा प्रसंग समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आणि हा व्हिडिओ तब्बल १० कोटींपेक्षा जास्त लोकांनी पाहिला. ही घटना केवळ त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यावरच नव्हे, तर त्या कंपनीच्या प्रतिष्ठेवर आणि व्यापकपणे कॉर्पोरेट संस्कृतीवरही गंभीर प्रश्न उपस्थित करणारी ठरली. असे म्हणतात की दोन पी कधी एकत्र करु नयेत. एक म्हणजे पर्सनल लाईफ आणि दुसरा पी म्हणजे प्रोफेशनल लाईफ. तथापि, मॉडर्न, आधुनिक आणि मुक्त वातावरण असणाऱ्या जगात खासगी आयुष्य व व्यावसायिक मर्यादा यामधील रेषा केवळ पुसट होत चालल्या नसून, त्या संस्थात्मक नियमनालाच आव्हान देऊ लागल्या आहेत.

एका सर्वेक्षणानुसार, ४४% ते ८५% पर्यंत बाह्यसंबंध हे कार्यालयात सुरू होतात. ही टक्केवारी निश्चितच धक्कादायक आहे. ॲशली मॅडिसन या विवाहबाह्य संबंधांसाठी प्रसिद्ध डेटिंग संकेतस्थळाचे मुख्य धोरण अधिकारी पॉल किबल म्हणतात की, ऑफिसमध्ये लोक आपला सर्वाधिक वेळ घालवतात; पण तिथेच नेमकी नात्यांची सीमारेषा धूसर होते आणि आकर्षण निर्माण होते.

मानसशास्त्रज्ञ देखील याला दुजोरा देतात. 'मिअर एक्स्पोजर इफेक्ट' नावाच्या संकल्पनेनुसार,



एखाद्या व्यक्तीला जितक्या अधिक वेळा आपण भेटतो, तितकं त्या व्यक्तीबद्दल आकर्षण वाढत जातं. सतत संपर्कात राहणं, सहकार्य, विनोद किंवा भावनिक पाठबळ यामुळे साहजिकच एक प्रकारचं जिव्हाळ्याचं नातं तयार होतं. कार्यस्थळी अनेक तास एकत्र घालवताना, लोक केवळ प्रोफेशनल राहत नाहीत. ते एकमेकांचा स्वभाव, आवडी–निवडी, वैयक्तिक अडचणी इत्यादी अनेक गोष्टी जाणून घेतात. यामध्ये कधी कधी साहचर्य निर्माण होतं, कधी सहानुभूती तर कधी मानसिक समजूत. ही समजूत हळूहळू भावनिक गुंतवणुकीकडे नेते.

काही लोक या आकर्षणावर नियंत्रण ठेवतात, तर काही जण नकळत त्यात गुरफटत जातात. मध्यंतरी सोसायटी फॉर ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट ने केलेल्या एका सर्वेक्षणानुसार, ५० टक्क्यांहून अधिक कर्मचाऱ्यांनी त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीत कधी ना कधी ऑफिसमध्ये प्रेमसंबंध ठेवले होते. विशेष म्हणजे, संस्थांनी जर ऑफिसमधील संबंधांवर बंदी घातली, तर अनेक वेळा याचा उलट परिणाम होतो. मानसशास्त्रानुसार, एखादी गोष्ट जर बंदीस्त असेल, तर ती अधिक आकर्षक वाटू लागते. ही संकल्पना 'फॉरबिडन फ्रूट इफेक्ट' म्हणून ओळखली जाते. समाज, धर्म, संस्था यामुळे विवाहबाह्य संबंध निषिद्ध मानले जातात. पण अशा अडचणीच्या किंवा निषिद्ध गोष्टींकडेच काही लोक आकर्षित होतात.

कार्यस्थळी निर्माण होणारे प्रेमसंबंध किंवा विवाहबाह्य संबंध हे एकवेळ संयमपूर्वक हाताळले जाऊ शकतात; पण जेव्हा हे संबंध गुप्त ठेवले जातात, तेव्हा ते संस्थेसाठी धोका ठरतात. २०२४ मध्ये करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणानुसार, फक्त २२ टक्के कर्मचारीच त्यांच्या प्रेमसंबंधांबाबत व्यवस्थापनाला माहिती देतात. उरलेले ७८ टक्के जण हे संबंध गुप्त ठेवतात. विशेषतः जेव्हा वरिष्ठ आणि कनिष्ठ यांच्यात संबंध असतो, तेव्हा ही गुप्तता अधिक ठळकपणे दिसून येते. कारण अशा प्रकारच्या संबंधांकडे कामाच्या जागी संशयाने पाहिले जाते.

अन्य एका सर्वेक्षणानुसार १९६५–१९८० या काळात जन्मलेल्या पिढीत ८६ टक्के प्रेमसंबंध हे गुप्त ठेवले गेले. दुसरीकडे, १९९७ नंतर जन्मलेल्यांमध्ये देखील हे प्रमाण चिंताजनक आहे. रेझ्युमे जीनियस या संस्थेच्या अहवालानुसार, ११ टक्के जेन–झेड कर्मचारी आपल्या कनिष्ठाशी प्रेमसंबंधात होते, तर ११ टक्के जण आपल्या वरिष्ठांशी संबंधात होते. हे आकडे कंपन्यांसाठी धोक्याचा इशारा ठरणारे आहेत. कारण अशा संबंधामुळे कामात पक्षपातीपणा, नैतिकता प्रश्न आणि टिममधील विसंवाद निर्माण होतो.''ॲस्ट्रोनॉमर'' कंपनीच्या घटनेत एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो मानव संसाधन विभागाचा प्रमुख स्वतःच जर व्यावसायिक मर्यादा ओलांडत असेल, तर इतर कर्मचाऱ्यांनी नियम पाळावे अशी अपेक्षा कितपत वाजवी आहे?

नोव्हेंबर २०१९ मध्ये मॅकडोनाल्ड्सच्या संचालक मंडळाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत स्टीव्ह ईस्टरब्रूक यांना मुख्य कार्यकारी अधिकारीपदावरून हटवले होते. कारण त्यांनी कंपनीतील एका महिला कर्मचाऱ्यासोबत व्यक्तिगत संबंध ठेवले होते. हे संबंध जरी दोघांच्या संमतीने असले, तरीही ते कंपनीच्या आचारसंहितेचा भंग करणारे होते. ऑगस्ट २०२० मध्ये मॅकडोनाल्ड्सने ईस्टरब्रूक यांच्यावर थेट फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल केला. कंपनीचा आरोप होता की ईस्टरब्रूक यांनी आपल्या संबंधांची खरी माहिती लपवली आणि कंपनीला चुकीच्या गोष्टी सांगितल्या. या नव्या तपासणीत असे निष्पन्न झाले की, त्यांचे तीन वेगवेगळ्या कनिष्ठ महिला सहकाऱ्यांशी लैंगिक संबंध होते आणि त्यापैकी एका महिलेला शेकडो हजारो डॉलर्सच्या स्टॉकचे वाटप त्यांनी केले होते.

तसेच, त्यांनी कंपनीच्या अधिकृत ईमेल खात्याचा वापर करून अश्लील फोटो आणि व्हिडिओ पाठवले आणि स्वीकारले, असाही गंभीर आरोपही करण्यात आला. या सर्व आरोपांमुळे मॅकडोनाल्ड्सने त्यांच्या बडतर्फीच्या कारणामध्ये बदल करून 'टर्मिनेशन फॉर कॉज' म्हणून नोंद करण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून कंपनी त्यांच्याकडून ४० मिलियन डॉलर्सहून अधिक रकमेचा सेवांत लाभ परत घेऊ शकेल. डिसेंबर २०२१ मध्ये, मॅकडोनाल्ड्सने जाहीर केले की, स्टीव्ह ईस्टरब्रूक यांनी तब्बल १०५ मिलियन डॉलर्स किंमतीचे रोखे आणि स्टॉक्स कंपनीला परत केले. ही रक्कम कार्पोरेट अमेरिकेतील सर्वात मोठ्या 'क्लॉबॅक'पैकी एक मानली गेली. २०२३ मध्ये एसईसीने ईस्टरब्रूक यांच्यावर औपचारिक कारवाई केली तेव्हा या प्रकरणावर अंतिम शिक्कामोर्तब झाले. या अंतर्गत त्यांना ४ लाख डॉलर्सचा दंड ठोठावण्यात आला.

जगप्रसिद्ध अब्जाधिश आणि मायक्रोसॉफ्टचे सर्वेसर्वा असणाऱ्या बिल गेट्स यांनी २०००च्या सुमारास एका सहकाऱ्यासोबत संबंध ठेवले होते. यामुळे कंपनीच्या बोर्डाने २०२० मध्ये त्यांच्याशी चौकशी सुरू केली आणि त्याआधीच त्यांनी बोर्डमधून राजीनामा दिला. संस्थेच्या संस्थापकानेही वर्तणुकीसंदर्भातील नियम पाळावेत, हा संदेश यातून मिळतो.

भारताचा विचार करता अशा प्रकारच्या संबंधांची खुलेआम चर्चा होत नसली तरी पडद्यामागे अशा संबंधांचे प्रमाण इथेही मोठे आहे. काही वेळा ही प्रकरणे दीर्घकाळ चालतात आणि विवाहांमध्ये परावर्तीत होतात, तर काही वेळा या प्रकरणांचा शेवट हाणामारी, खून, हत्या यातून होतो किंवा काही वेळा भांडणाअंती परस्पर समझोत्याने ते खंडित होतात. विवाह न झालेल्या तरुण–तरुणींमध्ये ऑफिसमधील सहवासातून प्रेम निर्माण होऊन विवाह झाल्याची तर शेकडो उदाहरणे आपल्याकडे आहेत. त्याबद्दल फार आक्षेप घेतले जात नाहीत; पण तेही एका मर्यादेपर्यंत. या संबंधांचा ऑफिसमधील परफॉर्मन्सवर परिणाम होऊ लागला तर सक्त ताकीद दिली जाते किंवा कामावरून काढून टाकले जाते.

वास्तविक पाहता हा विषय जितका संवेदनशील आणि नाजूक असतो, तितकाच तो नियमांशीही निगडित आहे. त्यामुळे ऑफिसमधील प्रेमसंबंधबाबत स्पष्टपणे 'डिस्क्लोजर पॉलिसी' असणे आवश्यक आहे, असे काहींचे म्हणणे आहे. यामध्ये समान स्तरावरील कर्मचारी संबंध ठेऊ शकतात, पण त्यांनी व्यवस्थापनाला कळवणे बंधनकारक आहे अशा प्रकारची अट घातली जाऊ शकते. त्याचबरोबर संबंध संपल्यानंतर कामाच्या ठिकाणी द्वेष, बदला, मानसिक त्रास इ. रोखण्यासाठी 'नॉन–रिटॅलिएशन पॉलिसी' असायला हवी असे काही जण सुचवतात. याचे कारण बहुतेकदा अशा प्रकरणांमध्ये महिलांचे शोषण केले जाते. कारण पुरुषप्रधान व्यवस्थेत महिलांना अशा संबंधांचा त्रास तुलनेने अधिक होतो.

१९९७ मध्ये सुप्रीम कोर्टाने 'विशाखा विरुद्ध राजस्थान सरकार' या खटल्यात ऐतिहासिक निर्णय दिला. भंवरी देवी या सामाजिक कार्यकर्त्येसोबत झालेल्या अत्याचारानंतर, कोर्टाने महिलांच्या कार्यस्थळी संरक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. हे ''विशाखा गाईडलाइन्स'' म्हणून प्रसिद्ध झाले. या निर्णयानंतर १६ वर्षांनी, २०१३ मध्ये केंद्र सरकारने ''कार्यस्थळी महिलांच्या लैंगिक छळवणुकीपासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३'' हा कायदा पारित केला.

हा कायदा ९ डिसेंबर २०१३ पासून अंमलात आला. या कायद्यामुळे कार्यस्थळी होणाऱ्या लैंगिक शोषणाचा सामना करण्यासाठी महिलांना एक कवच प्राप्त झाले. कायदे–नियम यांपलीकडे जाऊन नीतीमत्तेचे पालन करणे आणि व्यावसायिक जगात काम करताना आवश्यक असणारे कर्तव्यपालनाचे व जबाबदारीचे भान ठेवणे हे सर्वांत महत्त्वाचे आहे.

## गणितातील सूत्रे आणि संकल्पना उपयोगी येतात : डॉ. पाटील

**नायक वृत्तसेवा, धांदरफळ**

दैनंदिन जीवन जगत असताना गणित हे नेहमी मनुष्याच्या उपयोगी येत असते. विविध समस्या सोडवण्यासाठी गणितातील अनेक सूत्रे व संकल्पना उपयोगी येत असतात. गणितातील पाय या संकल्पनेचा बऱ्याच विज्ञान विषयात उपयोग करता येतो असे प्रतिपादन प्रसिद्ध वैज्ञानिक लेखक डॉ. निवास पाटील यांनी केले.

तालुक्यातील नांदुरी दुमाला येथील सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात विद्यालय व ना. बाळासाहेब थोरात उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय पाय दिनानिमित्त प्रसिद्ध वैज्ञानिक लेखक डॉ. निवास पाटील यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राजहंस दूध संघाचे संचालक विलास कवडे, विद्यासागर शिक्षण संस्थेचे सचिव सचिन मालेगावकर, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष शांताराम डोंगरे, विद्यालयाचे प्राचार्य बी. व्ही. वामन, शिक्षक देशमुख, गुंजाळ, उपरे , शिंदे, पावसे, शिंदे, शिरोळे, श्रीमती रोहम, उच्च माध्यमिकचे राऊत, सय्यद, श्रीमती कवडे, श्रीमती गोरडे, श्रीमती गायखे तसेच सुनील कवडे, निलेश गाडांळ, अरुण कवडे, शिक्षकेत्तर सेवक वृंद, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनेउपस्थित होते.

यावेळी इ.१० वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. निवास पाटील म्हणाले, मानवी जीवन हे विविध घटनांनी प्रभावित होत असून, सुखद आणि दुःखद घटना मानवी जीवनाला अर्थप्राप्त करून देतात. संख्याशास्त्रातील नियम आणि संबोधातून विविध अर्थ विद्यार्थ्यांना उलगडून दाखविले. विविध काळात संख्याशास्त्र संशोधकांनी संशोधनाअंती वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म सांगून पायची किंमत मांडणी केली आहे. आजच्या दिवसाचे महत्त्व गणिताच्या जगतात २३ जुलै हा पाय दिन म्हणून मानला जातो.





## आत्मा मालिकचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**नायक वृत्तसेवा, कोपरगाव**

महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला असून महाराष्ट्रात पुन्हा एकदा सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याचा उच्चांक तालुक्यातील कोकमठाण येथील आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुलने साकारला आहे. गुरुकुलाचे एकुण ३०० विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले असून यातील पाच विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

आत्मा मालिक सेमी इंग्लिश मीडियम स्कूलचे या परीक्षेत ४ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत, विशेष प्राविण्यात १४ विद्यार्थी, तालुका गुणवत्ता यादीत २१ विद्यार्थी, उत्तेजनार्थ गुणवत्ता यादीत १३ विद्यार्थी, तर प्रमाणपत्रासाठी २४३ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

यामध्ये यश केने राज्यात ४ था, श्लोक कदम राज्यात १३ वा, ओम वाळुंज राज्यात १३ वा, श्रेयश नलावडे राज्यात १४ वा, हर्षवर्धन उंडे राज्यात १५ वा तर राज हासे जिल्ह्यात २ रा, आयुष वामन जिल्हयात २ रा, अभिजीत जांभाळकर जिल्हयात ४ था, श्रेयश भवर जिल्हयात ४ था यांनी स्थान मिळविले.

आत्मा मालिक पॅटर्न अंतर्गत विविध स्पर्धा परीक्षांची विशेष तयारी केली जाते. त्यासाठी स्मार्ट सण्डे, सुवर्ण पहाट अभ्यासिका, घटकनिहाय सराव, विशेष तयारी वर्ग, दिर्घ सुट्टयांमध्ये तयारी शिबीरे, तज्ञांचे मार्गदर्शन, लेखक आपल्या भेटीला हे उपक्रम राबविले जातात, त्याची ही फलश्रुती असल्याचे प्राचार्य निरंजन डांगे यांनी सांगितले. या विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख सचिन डांगे, अनिल सोनवणे, रविंद्र देठे, रमेश कालेकर, बाळकृष्ण दौंड, मिना नरवडे, सागर अहिरे, पर्यवेक्षक नयना शेटे, गणेश रासने, सुनिल पाटील, नितीन अनाप यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे परमपूज्य आत्मा मालिक माऊलींच्या कृपा आशीर्वादासह संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंत भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठल होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदिपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, मिरा पटेल, प्राचार्य निरंजन डांगे यांनी अभिनंदन केले आहे.

# वंजारी समाजाच्या प्रश्नांवर चिंतन होणे गरजचे : डॉ. ढाकणे

**नायक वृत्तसेवा, नाशिक**



वंजारी समाज प्रगत व्हावा, यासाठी समाजाच्या न्याय हक्काच्या प्रश्नावर चिंतन होणे गरजेचे असल्याचे सांगून समाजाचे प्रश्न शासन दरबारी अवगत व्हावेत, यासाठी चिंतन मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे प्रतिपादन वंजारी समाजसेवा प्रतिष्ठानचे प्रदेशाध्यक्ष डॉ. एकनाथ ढाकणे यांनी केले.

वंजारी समाजाचा चिंतन मेळावा व राष्ट्रसंत भगवान बाबा यांची १२९ वी जयंती मंगळवारी नागपंचमीच्या दिवशी नाशिकच्या तपोवन परिसरातील लक्ष्मी मंगल कार्यालयात उत्साहात पार पडली. त्यावेळी उपस्थित समाज बांधवांना अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करतांना डॉ. एकनाथ ढाकणे बोलत होते. व्यासपीठावर माजी आ. बाळासाहेब सानप, दादासाहेब मुंडे, सुधाकर गर्जे, तुकाराम सांगळे, शशिकांत घुगे, नामदेव सानप, शामराव गीते, माया बुरकुल, विनोद केकाण, ॲड. सुरेश आव्हाड, सुरेश सांगळे, रामनाथ आव्हाड, भाऊसाहेब सानप यांच्यासह महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश आदी राष्ट्रीय व राज्यस्तरीय वंजारी समाजाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या १६ समाज बांधवांना डॉ. एकनाथ ढाकणे आणि माजी आ. बाळासाहेब सानप यांच्या हस्ते राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रस्ताविक तुकाराम सांगळे यांनी केले. स्वागत शामराव गीते, माया बुरकुल, नामदेव सानप यांनी तर आभार शामराव गीते यांनी मानले.

- राष्ट्रसंत भगवान बाबा यांची जयंती आणि पुण्यतिथी महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे साजरी करावी, वंजारी समाजाचे दोन टक्के जे आरक्षण आहे. ते अतिशय तुटपुंजे आहे, त्यामध्ये वाढ व्हावी, नाशिक येथील महामार्ग बसस्थानकांचे क्रांतिवीर वसंतराव नाईक नामकरण करावे, नाशिक ते भगवानगड तात्काळ लालपरी बस दैनंदिन सुरू करावी, वंजारी समाजाच्या न्याय प्रश्नासाठी आणि समाजाला उन्नत बनवण्यासाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ तात्काळ सरकारने गठीत करावे असे ठराव या चिंतन शिबिरात पारित करण्यात आले.

# १२ ऑगस्टला तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



राष्ट्र सेवादल संगमनेर आयोजित आदिवासी व दलित श्रमिकांचे नेते साथी भास्करराव दुर्वे नाना यांच्या स्मृतीप्रित्यर्थ १२ ऑगस्ट रोजी तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रकल्प प्रमुख सोमनाथ मदने यांनी दिली.

एकूण सहा गटांमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता तिसरी ते चौथी या गटासाठी आई थकत असेल का? संत गाडगेबाबा, नाती जपूया, शेतकरी जगाचा पोशिंदा, माझ्या कल्पनेतील सुंदर शाळा या विषयावर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. इयत्ता पाचवी ते सहावीसाठी बाप समजून घेऊ या, शेतीतील विज्ञान आपत्ती व्यवस्थापन एक आव्हान, स्वामी विवेकानंद आणि आधुनिक भारत, व्यसनाधीनता एक शाप. इयत्ता सातवी ते आठवीच्या गटासाठी वाचन संस्कृती व आपण, माझी आवडती महिला संत, निर्भय मी होणार, वसा समतेचा फुले शाहू आंबेडकरांचा, शहीद भगतसिंग यांच्या स्वप्नातील आधुनिक भारत, इयत्ता नववी ते दहावीसाठी संत आणि सामाजिक समतेचा विचार, खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे. समाजवाद शक्य आहे, साहित्य प्रबोधनाचा मार्ग, भारतीय संविधानाची ७५ वर्ष. इयत्ता अकरावी ते बारावी या गटासाठी शिवाजी महाराजांचे स्वराज्य, असा महाराष्ट्र घडवू या, हुंडाबळी नव्या विवाहाच्या सोहळ्याचे स्वरूप, पर्यावरण स्नेही जगण्याकडे चला, आरक्षण जात आणि सामाजिक समता. त्याचबरोबर खुल्या गटासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स संधी की संकट, सामाजिक सुधारणा व माझा सहभाग, मला समजलेले महात्मा गांधी, आई-वडिलांचे आई-वडील होऊ या, चला जाती धर्मा पलीकडे जगू या या विषयावर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. प्रत्येक गटामध्ये रोख रकमेचे पारितोषिक दिले जाणार आहेत. ही सर्व बक्षीसे पुस्तकाच्या स्वरूपात असणार आहेत. तसेच गटातील विजयी स्पर्धकांना स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे. स्पर्धकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. पहिल्या गटासाठी प्रथम क्रमांक पाचशे रुपये तर शेवटच्या गटासाठी प्रथम क्रमांक ११०० रुपयाचे बक्षीस असणार आहे. प्रत्येक गटात एका शाळेचे दोन स्पर्धक सहभाग घेऊ शकतील. प्रत्येक गटातील ५० टक्के सहभाग हा मुलींचा असणे आवश्यक आहे. स्पर्धा प्रवेशिका व स्पर्धा प्रवेश मूल्य प्रत्येक विद्यार्थ्यास वीस रुपये असणार आहेत.

सदरची स्पर्धा ही काशेश्वर विद्यालय कासारा दुमाला येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी सर्वोदय नागरी सहकारी पत संस्था, भास्करराव नाना दुर्वे सहकारी पतसंस्था व आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचे सहकार्य लाभले आहे. या स्पर्धेत तालुक्यातील जास्तीत जास्त शाळांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन भाऊसाहेब शिंदे, राजाभाऊ अवसक व सहकाऱ्यांनी केले आहे.

# चणेगावात नंदी ग्राम प्रदक्षिणा मिरवणूक उत्साहात !

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



तालुक्यातील चणेगाव येथील पुरातन श्री क्षेत्र रामेश्वर मंदिर जिर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त ग्रामस्थांच्या सहभागातून काढण्यात आलेली नंदी ग्राम प्रदक्षिणा मिरवणूक उत्साहात पार पडली. श्रावण मासातील पहिल्या सोमवारचे औचित्य साधत निघालेल्या या मिरवणुकीत भाविक भक्तांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या या मिरवणुकीत परीसरातील भाविक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. मिरवणुकीच्या अग्रभागी पताकाधारी, कावडधारी, कलशधारी, पारंपरिक वाद्ये, भजनी मंडळ, महिला, पुरुष सहभागी झाले होते. मिरवणुक समारोपानंतर शाबुदाना खिचडी व केळी प्रसादाचे वितरण करण्यात आले. दरम्यान येथील रामेश्वर देवस्थानच्या पिंड व नंदीचा जिर्णोद्धार प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त रविवार दि.१३ जुलै रोजी कलाकर्षण विधी, सोमवार दि.२८ रोजी नंदी मिरवणूक गाव दर्शन, मंगळवार दि.२९ जुलै रोजी प्राणप्रतिष्ठा विधी आणि बुधवार दि. ३० जुलै रोजी सकाळी श्री क्षेत्र रामेश्वर मठाचे बालब्रह्मचारी दत्तगिरी महाराज यांचे जाहीर हरिकिर्तन पार पडले. त्यानंतर महाप्रसाद होऊन या धार्मिक कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्वरा तपासे हिची सैनिकी शाळेत निवड

**नायक वृत्तसेवा, अकोले**

तालुक्यातील धामणगाव आवारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी स्वरा काळू तपासे हिची संरक्षण मंत्रालय संचलित सातारा येथील सैनिकी शाळेत इयत्ता सहावी साठी निवड झाली आहे.

संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे देशभरामध्ये ३३ सैनिकी स्कूल आहेत. या विद्यालयात प्रवेश परीक्षेसाठी देशभरातून जवळपास दोन लाख विद्यार्थी परीक्षा देतात.

स्वराने या प्रवेश परीक्षेमध्ये ३०० पैकी २७९ गुण मिळवून राज्यांत मुलींमधून (एस. सी. प्रवर्गातून) पहिला येण्याचा मान मिळवला. सातारा सिव्हिल येथे दोन दिवसाचे वैद्यकीय तपासणी पूर्ण केल्यानंतर तिची निवड निश्चित झाली. स्वरा हिने इयत्ता चौथीत असतानाच पहिल्या प्रयत्नात सैनिक स्कुल चंद्रपूर येथे प्रवेश मिळवला होता. चालू वर्षी ती नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेमध्ये जिल्ह्यात प्रथम



क्रमांकाने उत्तीर्ण होऊन नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर अहिल्यानगर येथे ही निवड झाली होती. स्वरा जि. प. प्रा. शाळा धामणगाव आवारीची विद्यार्थीनीं असून तिच्या यशा मध्ये वर्ग शिक्षक विक्रम गायकर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले तसेच आय कॅन इन्स्टिट्यूट पंढरपूरचे संचालक विवेकानंद भोसले व आय कॅन इन्स्टिट्यूटचे संस्थापक नवनाथ देशमुख यांचे ही वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. गणित विषयांचे शिक्षक शिवाजी रुपनर यांचे मार्गदर्शन मिळाले. स्वराचे वडील काळू तपासे प्राथमिक शिक्षक असून आई शितल तपासे ह्या रयत शिक्षण संस्थेमध्ये शिक्षिका आहेत.

# जिल्हा पुरस्कारासाठी 'लालाय्लू' कादंबरीची निवड

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

प्रा. संतोष भालेराव लिखित 'लालाय्लू' या ६०० पानी कादंबरीला साहित्य क्षेत्रात मानाचा समजला जाणारा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील जिल्हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

'लालाय्लू' तुन विनाअनुदानित शिक्षकांच्या व्यथा, वेदना, स्वप्ने, इच्छा-आकांक्षा या कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने प्रदर्शित केल्या असून शिक्षकांच्या प्रश्नाकडे व्यवस्थेचे गांभीर्याने लक्ष वेधले आहे.



लालाय्लू शिक्षण व्यवस्थेतील शेंडी लावणारी प्रवृत्ती वाढत आहे. त्याचे दर्शन या कादंबरीतून होत आहे. शिक्षण व्यवस्थेतील दाहकता या कादंबरीतून दिसून येत आहे. सामाजिक वास्तव, लेखकाचे अनुभव, अनुदानित शिक्षकांच्या संवेदना यातून सहाशे पानांच्या कादंबरीत दर्जेदार लिखाण आहे. शिक्षण खात्यातील भ्रष्टाचार वाढत आहे. शिक्षकांकडून संस्थाचालकांच्या अवास्तव अपेक्षा, आर्थिक देवाण-घेवाण, शिक्षकांची होणारी पिळवणूक याचा स्पर्श कादंबरीतून झाला आहे. अशा 'लालाय्लू' बृहद कादंबरीस साहित्य क्षेत्रातील अतिशय मानाचा समजला जाणारा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अहिल्यानगर जिल्हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

## पान १ वरुन

**संगमनेर शहर पोलिसांकडूनच सिग्नल व्यवस्थेचा 'खेळ'!**

ठिकाणी बसवलेली सिग्नल व्यवस्था पोलिसांशी सम न्वयाच्या अभावातून धूळखात पडून होती. त्यामुळे शहरातील गचाळ वाहतुकीत दिवसोंदिवस भर पडून आजच्या स्थितीत बेशिस्त आणि मनमौजी वाहनधारकांच्या कारणाने शहरातंर्गत वाहतुकीचा बोजवारा उडून हा विषय स्थानिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरु लागला होता. याबाबत माध्यमांनी वारंवार आवाज उठवून शहराच्या गचाळ वाहतुकीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचाही प्रयत्न केला. मात्र निष्क्रियतेची श्रृंखला जोपासणाऱ्या पोलिसांवर त्याचा कोणताच परिणाम झाला नाही.

जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच संगमनेरात आलेल्या पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासमोरही शहराच्या वाहतुकीचा मुद्दा उपस्थित झाला. त्यावर त्यांनी १५ जूनपर्यंत शहरातील तीनबत्ती चौक, हॉटेल काश्मिर व अकोले नाका या तीन ठिकाणचे सिग्नल तत्काळ दुरुस्ती करुन घेण्याचे व त्या दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वाहनांसाठी थांबारेषा आणि नागरिकांना रस्ता ओलांडण्यासाठी झेब्राक्रॉसिंगचे पट्टे आखून घेत वाहतुकीचे सक्तिने नियमन करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे गेली काही वर्ष धूळखात पडून असलेल्या शहराच्या सिग्नल व्यवस्थेचे एकप्रकारे पुनःरुज्जीवन होवून शहराच्या गचाळ आणि अतिशय बेशिस्त वाहतुकीला शिस्त लागेल अशी आशा निर्माण झाली होती.

पालिकेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी पोलीस अधिक्षकांच्या आदेशाचा सन्मान करताना तत्काळ वरील तीनही ठिकाणच्या सिग्नल व्यवस्थेची दुरुस्ती करुन पोलिसांच्या सूचनेनुसार त्यात वेळेचे गणितं जुळवले व थांबारेषा आखण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागातील अन्य एक निष्क्रिय उपअभियंता श्याम मिसाळ यांना कळवले. मात्र मलाई लाटण्याच्या नादात त्यांना कर्तव्याची पूर्तता करण्यास वेळच मिळत नसल्याने पालिका व पोलिसांकडून वारंवार आर्जवे करुनही त्यांच्या डोक्यातील 'ऊ' वळवळली नाही. त्यामुळे अखेर समाजाच्या बांधिलकीचे अखंड व्रत जोपासणाऱ्या दैनिक नायकने आपली भूमिका वठवताना या निष्क्रिय अधिकाऱ्याचे चिरहरण केले. त्यानंतरही त्याने अर्धवट स्वरुपात केवळ वाहनांसाठी आडव्या थांबारेषा मारुन हात झटकले.

यासर्व घडामोडी घडून आता जवळपास दोन आठवड्यांचा काळ लोटला आहे. शहरातील तीन ठिकाणी सिग्नल सुरु होण्यासह पोलिसांच्या सूचनेनुसार सार्वजनिक बांधकामने अर्धवट का होईना मात्र वाहनांसाठी थांबारेषा आखून दिल्याने पोलिसांनी अधिक्षकांच्या आदेशाचा सन्मान ठेवताना त्यावरुन सक्तिने नियमन सुरु करण्याची अपेक्षा होती. मात्र पूर्तता होवूनही उलटलेला कालावधी बघता स्थानिक पोलिसांनी पोलीस अधिक्षकांचा आदेश टोपलीत टाकल्याचे दिसून येत आहे.

शहरातील सिग्नल व्यवस्था सुरु झाल्यापासून बहुतांश वाहनधारक त्याचे स्वयंस्फूर्तीने पालनही करीत आहेत. मात्र नियम असूनही ते पाळण्याबाबतची सक्ती करणारेच अद्याप आसपास दिसत नसल्याने काही टवाळखोर आणि जन्मतःच बेशिस्त असलेल्यांकडून नियम पाळणाऱ्यांचे हसे उडवून सिग्नल व्यवस्थेचे नियम सर्रास तोडले जात असल्याचेही दुर्दैवी चित्र दिसत आहे. त्यातून पोलिसांना शहरातील वाहतुकीचा खेळ करायचाय की काय? अशीही शंका निर्माण झाली असून पोलीस अधिक्षकांच्या आदेशाला चक्क पोलिसांकडूनच टोपली दाखवली जात असल्याने आश्चर्यही निर्माण झाले आहे.

**भोजापुर पूरचारीचे पाणी शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी नियोजन करा : ना. विखे पाटील**

व्यक्त केले.

भोजापूर धरणाच्या लाभक्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने धरण ओव्हरफ्लो झाले आहे. ओव्हरफ्लोचे पाणी पुरचारीला मिळावे अशी मागणी वर्षानुवर्ष संगमनेर तालुक्यातील या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची होती. त्यामुळे या पुरचारीच्या कामासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून २ कोटी १२ लाख रुपयांचा निधीही मंजुर करुन देण्यात आला होता. विधानसभा निवडणूकीपुर्वी चारीच्या कामाचे भूमीपुजनही मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी मिळवून देणारच असा शब्द त्यांनी दिला होता.

यंदाच्या वर्षी पाऊस चांगला झाल्याने ओव्हरफ्लोचे पाणी या पुरचारीतून सोडण्यात आल्याने मागील चाळीस वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या या जिरायती पट्ट्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

तळेगाव, निमोण या भागातील पळसखेडे, पिंपळे, सोनेवाडी, क-हे, सोनोशी, नान्नज दुमाला या दुष्काळी पट्ट्यातील गावांना वर्षानुवर्षे या पाण्यापासून वंचित राहावे लागत होते. यासाठी या भागातील शेतकरी सातत्याने पाठपुरावा करुन, पाण्यासाठी संघर्ष करीत होते. याची दखल घेत, या गावांना पाणी मिळवून देण्यासाठी राज्यात महायुती सरकार आल्यानंतर चांगले प्रयत्न झाले. आ. अमोल खताळ यांनीही चारीच्या कामासाठी पाठपुरावा केला. यंदा चारीतून पाणी आल्याने या भागातील शेतकरी आनंदून गेला आहे.

या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी मिळवून दिल्याबद्दल भोजापूर पुरचारीचे अभ्यासक किसन चत्तर, भाजपाचे मंडल अध्यक्ष श्रीकांत गोमासे, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख विठ्ठल घोरपडे आदिंनी मंत्री विखे पाटील यांचा सत्कार करुन आभार मानले.

तुमच्या मागणी प्रमाणे पाणी देण्याचा शब्द मी पुर्ण केला आहे. आता शेवटच्या गावाला पाणी मिळावे तसेच चारीची गळती थांबविण्यासाठी अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे नियोजन करण्याच्या सुचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या आहेत.

**निमोण व कोंची परिसरात चोऱ्यांचे सत्र!**

याबाबत हाती आलेल्या प्राथमिक माहितीनुसार आज पहाटेच्या सुमारास तालुक्याच्या पूर्वभागातील कोंचीसह निमोण परिसरात चोरट्यांचा वावर आढळून आला. आसपासच्या परिसरात आडवस्तीला असलेली घरं लक्ष्य करताना चोरट्यांनी दोन ठिकाणी घरात प्रवेश करुन दागदागिने आणि रोकड घेवून पोबारा केला. या दोन्ही घटनांमध्ये चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि किरकोळ रोकड लांबवल्याचे समजते. तालुका पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलीस उपअधिक्षक कुणाल सोनवणे व तालुका निरीक्षक देवीदास ढुमणे यांच्यासह पोलीस पथकाने धटनास्थळावर जावून पाहणी केली.

या दोन्ही घटनांची अद्याप पोलीस दप्तरी नोंद झालेली नाही. मागील काही दिवसांपासून तालुक्याच्या ग्रामीणभागात सातत्याने चोरीच्या छोट्या-मोठ्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी केवळ घटनांची नोंद न करता त्यांचा गांभीर्याने तपास करुन नागरिकांना दिलासा देण्याची गरज आहे.


जाहिरात छोटी..... प्रतिसाद मोठा.

छोट्या जाहिरातीचे दर
रु.300/-
3+1 (4) दिवस
शब्द मर्यादा 40 फक्त

सेल्समन पाहिजेत
जेन्ट्स सेल्समन - 2 जागा
लेडीज सेल्समन - 3 जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर- 2 जागा
सारिका ड्रेसेस
बाजारपेठ, संगमनेर
9822358335

जाहिरातीसाठी संपर्क-सचिन
9767007746








'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

**पाहिजेत**

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४



बांधिलकी जनहिताची

# नायक

MAHMAR/2018/75654










## माकपच्या वृक्षारोपण अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नायक वृत्तसेवा, अकोले**

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने राज्यभर वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पक्षाच्या प्रत्येक शाखेच्या वतीने जनतेला बरोबर घेत पर्यावरण रक्षणाचे महत्त्व जनसामान्यांमध्ये रुजवत वृक्ष लागवड करण्यात आली.




जागतिक तापमान वाढीमुळे निसर्गाचे चक्र बदलू लागले आहे. एकाच दिवशी एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या पावसामुळे जगभर अनेक ठिकाणी विध्वंस होत आहे. तापमान वाढीमुळे पिके व अन्न, धान्य निर्मितीवरही विपरीत परिणाम झाला आहे. वाढत्या तापमानामुळे बर्फ वितळून नद्यांना पूर येत आहेत. विविध प्रकारच्या साथी व आजारही जगभर वाढत आहेत. पूर, वादळे, अतिवृष्टी, बेमोसमी पाऊस, हिम वर्षाव अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींची त्यामुळे वारंवारिता वाढली आहे. जीवसृष्टी समोर यामुळे मोठे संकट उभे राहिले आहे. या सर्व प्रश्नांची जाणीव करून देत निसर्ग संवर्धनाचे महत्त्व जनतेत रुजवण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने पुढाकार घेऊन महाराष्ट्रभर कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

- तथाकथित विकासाच्या नावाखाली महाराष्ट्रभर व देशभर सरकारच्या वतीने मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू आहे. शक्तिपीठ महामार्ग, वाढवण बंदर व गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड लोह खनिज उत्खनन प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात झाडे तोडली गेली आहेत. राज्यभर हजारो झाडांचे रोज बळी दिले जात आहेत.

## साकुरमध्ये भाविकांची मांदियाळी !

### हजारो भाविकांनी घेतले बिरोबा देवाचे दर्शन

**नायक वृत्तसेवा, साकुर**



राज्यातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले संगमनेर तालुक्यातील साकुर येथील विरभद्र बिरोबा देवाचे नागपंचमी दिनी हजारो भाविकांनी नतमस्तक होत दर्शन घेतले. यावेळी साकुर मध्ये भाविकांची मांदियाळी बघायला मिळाली.

श्रावण मासात साकुर येथील बिरोबा महाराजांच्या दर्शनासाठी महिनाभर भाविकांची गर्दी होत असते. विशेषतः नागपंचमी आणि नारळी पौर्णिमेला येथे भाविकांच्या गर्दीचा अलोट सागर पाहायला मिळतो.

या यात्रेसाठी राज्यभरासह परराज्यातून भाविक भक्त येथे हजेरी लावत बिरोबा महाराजांचे दर्शन घेत असतात. यंदाच्या वर्षी मंगळवार दि.२९ जुलै रोजी नागपंचमी असल्याने भाविकांनी येथे मोठी गर्दी केली होती. त्यानंतर आता दि. ९ ऑगस्टला नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनचा सण असल्याने हजारो भाविक दर्शनासाठी येणार आहेत. त्यामुळे येथील ट्रस्टने भाविकांचे विना अडथळा दर्शन व्हावे, यासाठी नियोजन केले आहे. नारळी पौर्णिमेच्या दिवशी भाविक गंगेचे पाणी कावडीने पायी आणत बिरोबारायाला गंगास्नान घालतात. यात्राकाळात वाण, ओव्यांसह विविध धार्मिक कार्यक्रम होत असतात तसेच महाप्रसादाचे वाटप केले जात असून अनेक स्वयंसेवक व तरूणांचे सहकार्य या कामी होत आहे. मंदिर परिसरात मिठाई, खेळणीसह विविध प्रकारच्या दुकानांनी गर्दी केली असून त्यांना ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे.

यात्रा कमिटीच्या वतीने नियोजनात कुठलीही कमतरता कमी पडू नये यासाठी बाजार समितीचे सभापती शंकर खेमनर, नामदेव खेमनर, अमित खिलारी, खेमनर, होळकर, एस. के. खेमनर आदी प्रयत्नशील आहेत. यात्रा काळात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी बजरंग दलच्या स्थानिक युवकांनी व घारगाव पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

- बिरोबा यात्रेनिमित्त निलम खताळ यांनी दर्शन घेत मंदिर परिसराची पाहणी केली. तसेच काही भाविकांशी चर्चा करत विचारपूस केली. यावेळी रक्तदान शिबीरालाही त्यांनी भेट दिली. साकूर पठार भागाचा पाणी प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागण्यासाठी त्यांनी बिरोबा चरणी प्रार्थना केली. यावेळी रौफ शेख, बाळासाहेब खेमनर, बुवाजी खेमनर, प्रियंका जाधव, गुलाब भोसले, अमृता कोळपकर, सुभाष भुजबळ, सुभाष पेंडभाजे, मच्छिंद्र खेमनर उपस्थित होते.

## भाजपाची शहर कार्यकारणी जाहीर!

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

भारतीय जनता पार्टी संगमनेर शहर मंडळाची नवीन कार्यकारिणी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली असून या कार्यकारणीत जुन्या नव्यांचा मेळ घालत ९३ पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, प्रदेश कार्यालय प्रभारी व उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवी अनासपुरे, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी खा. सुजय विखे पाटील, उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या सुचनेनुसार शहराध्यक्षा पायल आशिष ताजणे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे कार्यकारणी जाहीर केली आहे.

या कार्यकारिणीमुळे शहर मंडळात नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी काळात पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी हे पदाधिकारी महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास शहराध्यक्षा पायल आशिष ताजणे यांनी व्यक्त केला आहे.

तब्बल ९३ नविन, जुने सर्वसमावेशक घटकांना सामावून घेत जम्बो कार्यकारिणी जाहीर केली आहे, यामुळे पक्ष संघटनेला उभारी मिळेल व येणाऱ्या काळात नगरपालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणात यश मिळेल असा विश्वास व्यक्त करत सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे शहराध्यक्षा पायल आशिष ताजणे यांनी अभिनंदन करत नवीन पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून पक्षाच्या कार्याला गती मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

## श्रावण मासानिमित्त तीन दिवस कीर्तन, व्याख्यानांचे आयोजन : मालपाणी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



पवित्र श्रावण मासानिमित्त येत्या शनिवार दि.२ ऑगस्ट पासून राजस्थान युवक मंडळाच्या वतीने तीन दिवसांच्या धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी यांनी दिली. या धार्मिक कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रोत्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

श्रावण महिन्याच्या पावन पर्वकाळाचे औचित्य साधून मागील काही वर्षांपासून सातत्याने मंडळाच्या वतीने तीन दिवसीय उपक्रमाचे आयोजन केले जात असते.

शनिवार दि.२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ ते ८.३० या वेळेत बुलढाणा येथील प्रसिद्ध किर्तनकार पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. रविवार दि. ३ ऑगस्ट व सोमवार दिनांक ४ ऑगस्ट असे सलग दोन दिवस सायंकाळी ७ ते ८.३० या वेळेत प्रेरक व्याख्याते आणि गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांचे 'विषादातून विवेकाकडे : ज्ञानेश्वरी भाव यात्रा' या विषयावर व्याख्यान होणार आहे. मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर येथे होणाऱ्या या कार्यक्रमास प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य आहे. सर्वांसाठी खुर्च्यांची आसन व्यवस्था असणार आहे. कार्यक्रम बरोबर वेळेवर सुरू होऊन वेळेवर संपेल त्यामुळे श्रोत्यांनी वेळेच्या अगोदर दहा मिनिटे उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहनही मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

२०२५ हे मंडळाचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. यंदाच्या वर्षी अनेक सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम आयोजित केले जाणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष सुमित अट्टल, उपाध्यक्ष सागर मणियार, सचिव कल्पेश मर्दा, सहसचिव कृष्ण असावा, खजिनदार प्रतीक पोफळे, सहखजिनदार वेणुगोपाल कलंत्री यांनी दिली असून कार्यक्रमाच्या नियोजनासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य कार्यरत आहेत.

## उंबरी बाळापुर येथे बिबट्या जेरबंद

**नायक वृत्तसेवा, आश्वी**

संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापुर येथील कारवाडी परिसरात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात मादी बिबट्या जेरबंद झाला. १७ जून रोजी येथील शेतकरी मच्छिंद्र दगडू कालेकर हे जनावरांसाठी गिन्नी गवत तोडत असतांना बिबट्याने त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करुन जखमी केल्याची घटना घडली होती. त्यानंतर तब्बल ४० दिवसांनी कालेकर यांच्यात शेतात



वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात मादी बिबट्या जेरबंद बंद झाला.




नायक ANCHOR

## महिलेच्या तोंडावर गुंगीचा स्प्रे मारुन चोरी !

### सोन्याच्या दागिन्यासह रोख रक्कम लांबवली

**नायक वृत्तसेवा, अकोले**

तालुक्यातील कोतुळपासून १ किलोमीटर अंतरावरील साबळेवाडीमध्ये सोमवारी रात्री ११.४५ वाजेच्या सुमारास चोरट्यांनी झोपलेल्या महिलेच्या तोंडावर गुंगीचा स्प्रे मारून गळ्यातील मनी मंगळसूत्र व पाच ते सहा हजार रोख रक्कम चोरून पोबारा केला.

साबळे वस्ती येथील शेतकरी शांताराम मुकिंदा देशमुख, त्यांची पत्नी, सुन व दोन नातवंडे हे सायंकाळी जेवण करून घरात झोपलेले असतांना मध्य रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाज्याची कडी कापून घरात प्रवेश केला. यावेळी घरातील दिवाणखान्यात देशमुख यांची सुन व नातवंडे झोपलेली होती तर शांताराम देशमुख आपल्या पत्नीसह आतील शयनकक्षात झोपलेले होते. चोरट्यानी देशमुख झोपलेल्या शयन कक्षाची बाहेरून कडी लावुन घेतली. आणि दिवाणखान्यात झोपलेल्या



सुनेच्या तोंडावर गुंगीचा स्प्रे मारून तिच्या गळ्यातील पावणे दोन तोळ्याचे सोन्याचे मनी मंगळसुत्र ओरबाडून घेतले. त्याचबरोबर कानातील पाच ग्रॅमच्या रिंगा काढुन घेतल्या. शेजारील बेड उचकून त्याखाली ठेवलेले पाच, सहा हजार रोख रक्कम काढून घेतली. यावेळी चोरटे स्वयंपाक घरात जात असतांना चोरट्याचा पाय झोपलेल्या सुनेच्या पायावर पडला व ती शुद्धीवर आली असता तिने आरडाओरडा केला परंतु शयनकक्षाचा दरवाज्याची कडी बाहेरून लावलेली असल्याने सासु सासरे काहीच करू शकले नाहीत. चोरट्यानी अंधाराचा फायदा घेत पलायन केले. काही वेळाने परिसरातील लोक जमा झाले. त्यांनी शोधा शोध केली परंतु चोरटे पसार झाले.

त्याच ठिकाणी शंभर फुटावर १ महिन्यापूर्वी अपंग व विधवा महिलेला मारहाण करून तिचे सोन्याचे मंगळसुत्र व चांदीचे दागीने व रोख रक्कम घेऊन चोरटे फरार झाले होते.








**कुटे हॉस्पिटल अ‍ॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर**

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय् KH

४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६

**डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.)** Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398

**डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya)** Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A

● मॉड्युलर ऑपरेशन थिएटर ● एसी/डिलक्स रुम्स् ● महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध ● तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ ● डायलेसिस विभाग ● इन्टरकॉम, टीव्ही ● ९ बेडस्चा सुसज्ञ आय.सी.यु. विभाग व सुसज्ञ अपघात विभाग ● नर्स कॉल बेल सिस्टिम ● गरम पाण्यासाठी सोलर ● सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन ● सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया ● सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध ● अत्याधुनिक सुविधा ● ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५